# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

**Vol.- 10 Issue 5 नोव्हेंबर - २०१७ (pages 24) November 2017**


## संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

गेल्या महिन्यात दीपोत्सवी सण संपला. दीपावली आपल्या सर्व सभासदांना नक्कीच आनंददायी गेलेली असेल. ३१.१०.२००२ पूर्वी निवृत्त झालेल्या बहुसंख्य निवृत्त सभासदांना द्विपक्षीय वित्तीय करारानुसार नुकतीच थकबाकी मिळालेली आहे. फारच थोड्या सभासदांना अजून थकबाकी मिळणे शिल्लक आहे. ज्यांना अजूनही थकबाकीची रक्कम काही तांत्रिक कारणामुळे मिळालेली नाही, त्यात बहुतांश फॅमिली पेन्शनर्स आहेत.

५०% बेसिकसाठी न्यायालयीन पातळीवर आपले प्रयत्न चालू आहेत आणि त्यात आपण लवकरच यशस्वी होऊ याची खात्री आहे. दुर्दैवाने संघटनेकडे आर्थिक देणगीचा येणारा ओघ मात्र अपेक्षेनुसार नाही. तरीही सभासदांच्या देणग्यांचा ओघ चालू झाला आहे आणि यापुढे त्यात वाढ होईल असा विश्वास वाटतो. कारण त्यामुळेच संघटनेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढेल. संघटना चालविण्यासाठी कार्यकर्ते जसे आवश्यक असतात तसेच आर्थिक पाठबळदेखील आजच्या काळात आवश्यक आहे. ह्या दोन्ही बाबतीत आपली असो. भक्कम पायावर उभी राहावयास हवी ही आमची तळमळ आहे.

येणारे नवीन वर्ष आपल्या सर्व सभासद मित्रांना व त्यांच्या कुटुंबीयांना आनंद, समाधान देणारे व आरोग्यपूर्ण जाण्यासाठी माफक व्यायाम म्हणजे चालणे, योगासने इ. करणे जसे आवश्यक आहे तसेच एखादा चांगला छंद लावून घेणे देखील आवश्यक ठरते. शारीरिक मर्यादेमुळे बाहेर जाऊन सामाजिक कार्यात भाग घेता येत नसेल तर घरी बसल्या बसल्याही अनेक गोष्टी करता येतील, अनेक छंद जोपासता येतील.

आमचे एक मित्र रोजच्या वर्तमानपत्रात आलेले विनोद, व्यंगचित्रे, चांगल्या कविता, जुनी हिंदी-मराठी गाणी इ. ची कात्रणे गोळा करतात. वर्तमानपत्राचा कागद जास्त टिकत नाही. मग ती कात्रणे एकत्र करून, त्यांच्या झेरॉक्स प्रती करून ते विषयानुसार फाईल्स तयार करतात. मधून मधून त्यांचे वाचन करतात. मित्रांमध्ये गप्पांमध्ये मित्रमंडळींचे मनोरंजन करतात. उत्तम छंद असला तर आपला वेळ आणि मन व्यवस्थित गुंतवले जाते. इतरही गोष्टी आपल्या आवडीनुसार व शारीरिक क्षमतेनुसार आणि उपलब्ध साधन-सामुग्रीप्रमाणे निवडता येतील.

'संवाद'कडे अनेक सभासद, त्यांचे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले कथा-काव्यसंग्रह पाठवीत असतात, काही सभासद वैचारिक, आध्यात्मिक व प्रवासवर्णनपर साहित्य पुस्तकरूपाने पाठवीत असतात. त्यांचे कौतुक वाटते. आम्ही संपादक मंडळी ही पुस्तके आवर्जून वाचतो व 'संवाद' मध्ये त्या लेखकांची व पुस्तकांची दखल घेतली जाते. त्यामुळे इतर सभासदांना नक्कीच प्रेरणा मिळते.

आम्ही आमच्या सभासदांना पुनश्च आवाहन करू इच्छितो की आपण स्वतःला कुठल्या-ना-कुठल्या छंदात रमवा. त्यातून स्वतःला मानसिक आनंद मिळेलच. पण तो आपण इतरांनाही देऊ शकाल. आपला छंद इतरांना प्रेरणादायी ठरू शकतो. तेव्हा मित्रांनो छंद जोपासण्यातला आनंद घ्या आणि आनंद वाटा कारण हेही फार मोठे समाजकार्य ठरेल.


वसंत धुपकर

मो.नं.८९७५२१८०४९

## Unit Varta -

**Panaji ZSC: Special Report From Panaji ZSC**

A Special function was organised by SBI Pensioners' Association, ZSC, Panaji on Thursday, the 12th October 2017 at S.B. Learning Centre, Panaji at 4.30 P.M. mainly for delivering the Gold Medal (awarded to Late Shri P. M. Narkar) to Mrs. P. P. Narkar. This was followed by the Monthly Meeting of the ZSC Managing Committee.

Sarvashri S.B. Gokhale, Circle President, Vilas V. Gandhe, Circle Secretary, R. S. Rajivdekar, Principal Secretary, Mumbai ZSC, and D.A. Kulkarni, Circle Treasurer, specially came to attend this Meeting and graced the occasion. Shri Gokhale was the Chief Guest at the function. The Circle Management Committee declared the award in its Meeting on 30th May 2017 at Pune and the same was conveyed to Shri P. M. Narkar, who then humbly had acknowledged and thanked the CMC for selecting his name for the 'Gold Medal'. However, unfortunately, he could not live to receive it personally.

Shri M.Y. Desai, President, ZSC, Panaji welcomed the audience and explained the significance of the Award. Shri S. B. Gokhale, handed over the 'Late Shri L.N. Pabalkar Memorial Gold Medal' to Smt. Pushpa P. Narkar, widow of Late Shri P.M. Narkar. Two daughters of Smt. Narkar were also present on this occassion. Shri Gandhe recited the citation and handed over the framed copy to Smt. Narkar. In her reply, the tearful Smt. Narkar and one of her daughters thanked the Association for recognising the work of Late Shri Narkar.

Shri M.H. Parvatkar, Vice President (NG), briefed about the activities and proposed plans to help the members in matters of Mutual Welfare Scheme, etc. Shri Gokhale in his speech praised the work of Late Shri Narkar for SBI Pensioners' Association as well as the 'Federation SBIPAs'. He spoke about the position of arrears disbursements and the court case. The participation was overwhelming with 70 members being present. The other highlight of the occasion was collection of Rs.1.72 lac by way of donation and 4 membership applications fees. Smt. Jennifer Fernandes, compered the programme and Shri I.H. Dias, Secretary proposed vote of thanks. The Meeting was concluded with 'High Tea.

*Secretary*, **Panaji ZSC**

### Pensioners' Day

**17th December is "Pensioners' Day".**

We congratulate all our members and wish them a "Happy Pensioners' Day." Let us hope that our case NO. 1875 of 2013, in Delhi High Court, for our demand for 50% pension, will be decided positively in our favour as early as possible, since our demands are legitimate.

***Secretary***

### A magnanimous gesture by Late Shri Behram K. Kotwal

We have great pleasure in advising our members that Late Shri Behram K. Kotwal our Member from Mumbai, bequeathed Rs.1,00,000/- (Rs. One lac only) as donation to 'SBI Pensioners' Association' as per his "WILL". This amount has been remitted by the Administrators to the Estate of Late Shri Behram K. Kotwal. We are not only thankful but very grateful to him for this large-hearted gesture.

Though, Shri Behram K. Kotwal, is not amongst us today, the love and affection shown by him for our Association has no match. This also shows that he cared for our Association even after his death and this has also displayed his strong belief in the working of our Association.

We salute his feelings and value the generosity shown by him. We pray the ALMIGHTY to rest his soul in eternal peace.

**Vilas Gandhe, General Secretary,**
**SBIPA, (Mumbai Circle), Pune.**

(We publish hereunder an article, giving in brief the history of Pension in SBI from the period of Bank of Bombay to the present period)

**BANK OF BOMBAY OFFICERS' PENSION & GURARANTEE FUND RULES AND REGULATIONS**

**Para 22 :** That pensions shall be payable at the rate of **one sixtieth part,** for every year he has served, of the average substantive salary drawn by the employee for the last five years of his service.

**Para 23 :** That an employee retiring from the Bank before completing twenty-five years' service shall be entitled to his contributions to the Pension Fund with the interest due thereon.

**Para 24 :** That an employee retiring from the Bank's service after having completed twenty years' service, but before the completion of twenty-five years' service, shall be entitled to pension if he shall have attained the age of fifty years, or if he shall satisfy the Directors of the Bank, by approved medical certificate or otherwise, that he is incapacitated for further active service.

**Para 25 :** That maximum pension, except in cases which the Trustees in their discretion may unanimously consider special, shall not exceed Rs.750/- per mensem and that in no case shall it exceed Rs.1,000/- per mensem.

**STATE BANK OF INDIA EMPLOYEES' PENSION FUND RULES OF 23.02.1965 AND REGULATIONS DATED 15TH SEPTEMBER, 2014**

**Para 22 (2) :** A member who has attained the age of fifty-five years or who shall be proved to the satisfaction of the authority empowered to sanction his retirement to be permanently incapacitated by bodily or mental infirmity from further active service (such infirmity not being the result of irregular or intemperate habits) may, at the discretion of the trustees, be granted a proportionate pension.

**Para 22 (3) :** A member who has been permitted to retire under clause (c) of sub-regulation (1) shall be entitled to proportionate pension.

**Para 23 : Computation of pension :**

(1) Subject to the provisions of sub-regulation (2) and (3) the pension payable under regulation 22 shall be the amount calculated at the rate of **one-sixtieth part of every year's pensionable service** of the average monthly substantive salary drawn during the last twelve months' pensionable service.

(2) The maximum pension shall not exceed **one-half** of the average monthly substantive salary drawn during the last twelve months pensionable service or rupees two thousand four hundred per month (pro-rata in the case of part time employees) whichever is less.

The pension in State Bank of India was at Rs.750/- per month upto AGM level and Rs.1,000/- per month to Dy.GM. And above category.

This pension was being paid right from the beginning up to 1987 as mentioned above.

In 1987 we had filed a case in Supreme Court for one half (50%) as pension as the basic pay of DMD was Rs.4, 800/- per month however he was getting pension at Rs.1,000/- per month.

The case was decided in our favour on 23.02.1989. At that time the report of the 4th Central Pay Commission was published which was based on D.A. merger of 608 points CPI 1960=100. At that

*!! We wish all our Members "Merry Christmas" !!*

time the basic pay of the Secretary to the Government of India was Rs.9,000/- per month and maximum pension was Rs.4,500/- per month. Hence our pension was revised to Rs.2, 400/- per month.In 1989 the 5th BP settlement talks were in progress and the pensionable pay of Dy.MD was fixed at Rs.7, 550/- pm. Accordingly the Bank had recommended the pension at Rs.3,775/- per month which was declined by the Government of India on 16.09.1991,stating **"The Government has come to a decision that there is no rationale to revise upwards the existing ceiling on pension in the State Bank of India which may continue to be Rs.2,400/- p.m."** The salary was revised as per 6th BPS but pension was not revised. Thereafter without Banks recommendations the pension was unilaterally fixed at Rs.4,250/- per month for all categories. In the 7th BPS salary was revised at 1684 DA merger. However for the purpose of pension salary was to be considered **as if DA was merged at 1616 points.** Due to this there was indirect recovery. (Though this clause was not applicable to State Bank of India as per agreements with staff federations)

The pension of Rs.4,250/- was payable for 9 categories right from Dy.MD to JMGI. The salary of JMGI was Rs.9,200/- p.m. therefore pension should have been Rs.4,600/-.Thereafter the Government of India on 23.02.1999 sanctioned the pension w.e.f. 01.03.1999 as under:

| | |
|---|---|
| Employees/officers having pay | |
| Upto Rs.8, 500/- pm | 50% of the pay |
| Employees/Officers having pay | |
| Exceeding Rs.8,500/- p. m. | 40% of the pay subject to minimum of Rs.4,250/- |

The above changes are due to notice served by the Federation/Association on Bank, Government of Indiaand Reserve Bank of India on 22.05.1998

The fixation was imposed by the Government of India without Banks recommendations. However, pension of Rs.2,400/- per month continued from 01.11.1987to 28.02.1999.

The bank is strictly adhering to the provisions of SBI Employees Pension Fund Regulations and recommendation for realignment of pension ceiling is also in conformity with the extant provisions. As a matter of fact, proposal for realignment of pension is not only for removing the prevailing anomalies in respect of certain categories of pensioners but also for moving a step forward towards adherence of Pension Regulation 23(1) of SBI EPFR which reads as follows :

"***Regulation 23*** **: Computation of pension :**(1) Subject to the provision of sub-regulations (2) and (3), the pension payable under regulation 22 shall be the amount calculated at the rate of one-sixtieth part of every year's pensionable service of the average monthly substantive salary drawn during the last twelve months pensionable service."

**Pension ceiling in contravention of the provisions in Regulation 23 of SBI Employees Pension Regulations :**

a) 5th Bipartite settlement – The pension ceiling of monthly pension in respect of pensioners who retired during 01.11.1987 to 31.10.1992 are not aligned to their last drawn salary as per 5th BP settlement and this should have been revised from R.2,400/- to Rs.3,775/- pm (50% of pensionable pay during 5th BP).

b) 7thBPS : Pension ceiling of 7th BP retirees is linked to pre-revised scale i.e. pay scale of

6th BPS. The pension of 7th BPS retirees is required to be indexed to the last drawn salary w.e.f 1.11.1997 and computed on the basis of average of last 12 months salary.

Due to our court case the Government of India appointed **Murmu Committee** in February 2016 and they have submitted the recommendations to the GOI in October 2016. The Bank had submitted recommendations as per committee Report on 22.11.2016. The GOI approved the recommendations of the committee on 20.04.2017 which are published in the SAMVAD issue of May 2017 on page No.10. **The Committee has not taken any cognizance in respect of 6th BPS.**

**Pension** is a socio-economic justice measure providing relief when advancing age gradually but irrecoverably impairs capacity to stand on one's own feet. Pension is a right and not a bounty.

**Dearness Relief :** Dearness relief is paid to mitigate the increasing cost / inflation partly. The D R is worked out on CPI index 1960 = 100. (Working class)

**PAYMENT OF ARREARS :**

Dearness Relief Index figure from 01.01.1986 to 31.01.2006 were with us. The further DA Index figures were collected from IBA, Mumbai. The calculations of D.A. payable to 5th to 7th BPS retirees were worked out by Sarvashri Tapas Dutta and C.P. Muley both Chief Managers (System – Admin.) from State Bank of India, Corporate Centre, Mumbai. These calculations were checked by us. The payment of arrears of pension are on ad hoc basis started from 15.07.2017 through CAO, Kolkatta and the work of payment of arrears is still in progress.

Incidentally, peruse SAMVAD issue for July and August, 2011 for gist of efforts for redresal of grievances of pensioners and family pensioners since 1974 by the SBI Pensioners' Association (Mumbai Circle)

As you are aware our court case is still continuing for payment of pension at 50% of last drawn salary to all the bank's pensioners. As on today we are required to pay nearly Rs.75 laces to the Solicitors and there will be payment in future also till we succeed. We therefore, appeal you to **donate generously** as requested in our SAMVAD for the month of August, 2017.

**We wish all the pensioners good and sound health. Best wishes for New Year.**

**S.B.Gokhale**

Date : 12th November, 2017 President, SBIPA, Mumbai Circle, Pune

******************************************************************************************************

**विनोद**

## जेलमंत्री

तिकीट चेकर (प्रवाशास) ''तुम्ही विना-तिकीट प्रवास करीत आहात त्याबद्दल दंड भरावा लागेल''

प्रवासी ''माझी रेल्वे मंत्र्यांशी थेट ओळख आहे. मी दंड का भरु?''

तिकीट चेकर- ''ठीक आहे तुम्ही दंड भरणार नसाल तर मी तुमची 'जेल' मंत्र्यांशी ओळख करुन देईन.

वसंत धुपकर, पुणे

**।। सर्व सभासदांना ख्रिसमसनिमित्त हार्दिक शुभेच्छा ।।**

## "Late Shri.N.G.More Service Award" winner Shri. Ashok G. Patrikar, Nagpur

Shri. Ashok G. Patrikar has been awarded this year's 'N. G. More Service Award'of SBI Pensioners'Association,Zonal Sub Centre, Nagpur sponsored by Late Shri E. K. Thakur.Shri. Patrikar joined the Bank on 18.7.1969 at Kamptee, Nagpur and was promoted as an officer in 1981. During his tenure as an award staff member as well as also as an officer, he was very active in SBI Employees' Union and SBIOs' Association activities. He held various important positions in the SBI &Associate BanksEmployees Union as also in the SBI officers' Association.During his posting at VRCE Branch, Nagpur he was very much instrumental in opening Bank's dispensary at VRCE premises.

He opted for VRS in March 2001. He started his 2nd inning as a pensioner from 1-4-2001 and from day one he has given his 100% contribution in furthering the cause of our SBIP Association. In the initial years of his retirement i.e. 2002-03 he along with other senior pensionersLate Shri.Naniwadekar,Shri Ghanekar and others enrolled lot of new members for our Association. His endeavor for the progress of our Association and welfare of all pensioners is still continuing. After his retirement from bank'sservice he got associated with various social organizations. Prominent amongst them are :

i) Pashchim Nagpur Nagrik Sangh, Ram Nagar, Nagpur, ii) Trustee of Ram Mandir &Hanuman Mandir, Ram Nagar, Nagpur, iii) Presently he is the Vice President of P.N.N. Sangh, Nagpur, iv) Sanjivani Pranayam Centre Nagpur, v) Vidarbha Hindi SahityaSammelan, Mor bhavan, Nagpur."

As a Vice President of SBI Pensioner's Association, ZSC Nagpur,in 2015 in a CMC Meeting, he supported strongly to hold our Circle AGM for the first time at Nagpur. This AGM turned out to be a grand success.

I, on behalf of all our friends & well-wishers, congratulate Shri. Ashok Patrikar for the above award and pray to almighty to shower his blessings by giving good health, life full of happiness and wonderful life to Shri. Ashok G. Patrikar in the years to come.

**M. P. S. Sawhney** -President, Nagpur ZSC (M) 9890765782

******************************************************************************************************

## श्री. एन. जी मोरे सर्विस ॲवॉर्डचे मानकरी- श्री. एम्. डी. कोल्हटकर

ह्या वर्षीच्या कै. एकनाथ ठाकूर पुरस्कृत श्री नानासाहेब मोरे सर्व्हिस अवार्डचे मानकरी श्री. महेश्वर दत्तात्रय ऊर्फ ''रामभाऊ'' कोल्हटकर दि. ३१ मार्च २००० रोजी बँकेतून सेवानिवृत्त झाले.

त्यांच्या कार्यकाळात एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. अधिकाऱ्यांच्या संघटनेमध्ये कार्यरत असतांना स्वर्गीय श्री एकनाथजी ठाकूर ह्यांचा त्यांचेवर विशेष प्रभाव होता. कै. श्री. ठाकूरांचे विश्वासू सहकारी म्हणूनच त्यांची गणना होत असे.

सेवा-निवृत्तीनंतर त्यांनी अनेक सामाजिक संस्थांशी स्वतःला जोडून घेतले. त्यात प्रमुख म्हणजे 'पेन्शनर्स असोसिएशन', 'पेन्शनर्स क्लब नागपूर', 'सारथी', 'विश्व हिंदू परिषद', विवेकानंद मेडिकल मिशन, खापरी', 'मातोश्री वृध्दाश्रम आदासा' इत्यादी. पेन्शनर्स असोसिएशनमध्ये दीर्घकाळ कार्यकारिणी सदस्य म्हणून, पेन्शनर्स क्लब नागपूरमध्ये कार्यकारिणी सदस्य तसेच नंतर अध्यक्ष म्हणून, सारथीमध्ये उपाध्यक्ष म्हणून त्यांचे विशेष योगदान राहिले. पेन्शनर्स सहकाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यात, त्यांना मदत करण्यात त्यांनी नेहमीच आनंद मानला. काही बाबतीत मतभेद असलेल्यांनाही मदत करण्यासाठी, मार्गदर्शनासाठी ते नेहमीच तत्पर असतात. सहकाऱ्यांचे सुप्त गुण, त्यांची प्रतिभा ओळखून त्यांना प्रोत्साहीत करण्यात त्यांनी नेहमीच धन्यता मानली. अनेकांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरु केली.वैद्यकीय क्षेत्रात अनेक डॉक्टरांशी आत्मीय संबंध असल्यामुळे गरजूंना त्यांची अपॉइंटमेंट मिळवून देण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले. अनेक पेन्शनर्सना त्यांनी सर्वतोपरी मदत केली आहे. कौटुंबिक जीवनातही ते सुखी, समाधानी व तृप्त आहेत. अशा आमच्या ह्या सर्वार्थाने ज्येष्ठ असलेल्या मित्राला मिळालेल्या ह्या सन्मानाकरीता त्यांचे हार्दिक अभिनंदन. त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो ही ईश्वराजवळ प्रार्थना व त्यांना पुढील वाटचालीकरीता भरपूर शुभेच्छा.

- अनिल पिंपळापुरे (नागपूर) ७८७५०९९६९९

# विशेष सर्वसाधारण सभा व ४३व्या वार्षिक सर्व साधारण सभेचा वृत्तांत

आपल्या संघटनेची विशेष सर्वसाधारण सभा व ४३वी वार्षिक सर्व साधारण सभा दि.१७ सप्टेंबर २०१७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. मराठवाड्यात आपल्या सर्कल असोसिएशनची ही पहिलीच वार्षिक सभा असल्याने सर्व सभासदांचा व कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वहात होता.

२. सभेच्या विषय पत्रिकेप्रमाणे प्रथम विशेष सर्व साधारण सभेस सुरुवात झाली. व्यासपीठावर सर्वश्री एस.बी.गोखले, सभेचे व सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष, बाळासाहेब दांडेकर, संघटनेचे सल्लागार, साहेबराव देसाई, अध्यक्ष, औरंगाबाद झो.स.सें, अविनाश निमदेव, अध्यक्ष अमरावती झो.स.सें., एस्.एम्.धराधर, अध्यक्ष मुंबई झो.स.सें, मोहिंदरसिंग सहानी, अध्यक्ष नागपूर, झो.स.सें., माधव देसाई, अध्यक्ष, पणजी झो.स.सें., चंद्रकांत कुलकर्णी, अध्यक्ष, पुणे झो.स.सें., एन्.के.जोशी, सचिव औरंगाबाद झो.स.सें., डी.ए.कुळकर्णी, सर्कल ट्रेझरर व विष्णु मुकीम सर्कल जॉईंट सेक्रेटरी इ. सर्व स्थानापन्न झाल्यावर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

३. श्री. विलास गंधे, सर्कल सेक्रेटरी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेचा प्रारंभ केला. श्री. गंधे यांनी आपल्या संघटनेचे 'मेमोरँडम ऑफ असोसिएशन व रूल्स अँड रेग्युलेशन्स' यामध्ये १९९६ सालानंतर बदल झालेला नसल्याची माहिती दिली. काही बदल २००३ मध्ये केले होते पण त्यांचा योग्य तो पाठपुरावा वेळोवेळी न झाल्याने असिस्टंट चॅरिटी कमिशनर, पुणे यांचेकडून त्यास मान्यता मिळवायची राहून गेली व त्यामुळे आपली त्याबद्दलची केस तशीच प्रलंबित राहिली. त्यानंतर बराच काळ गेला व आता या सर्व नियमात पुन्हा बदल करणे अपरिहार्य आहे. याबद्दलची सर्व कारणे श्री. गंधे यांनी विस्तृतपणे विषद केलीत. त्याचप्रमाणे संघटनेमधील निवडणुकांसाठी वेगळे ''इलेक्शन रूल्स'' पण तयार केल्याचे त्यांनी सांगितले. याबद्दलची सर्व माहिती सभासदांना जी पुस्तिका पाठविण्यात आली व सभेपूर्वीपण देण्यात आल्या होत्या, त्यामध्ये दिलेली आहे. दोन्ही विषयावर काही सभासदांनी बरीच चर्चा केल्यावर 'मेमोरँडम ऑफ असोसिएशन व रूल्स अँड रेग्युलेशन' मध्ये सुचविलेले सर्व बदल, नवीन तयार केलेले नियम, तसेच निवडणुकीबद्दलचे केलेले सर्व नवीन नियम, सभासदांनी एकमताने मंजूर केलेत.

४. ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ११.३० वा. सुरू झाली. श्री. उमाशंकर कोल्हे, सहाय्यक महाप्रबंधक, औरंगाबाद क्षेत्र, हे प्रमुख पाहुणे होते. सर्व मान्यवरांनी दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचा शुभारंभ केला. श्री. अशोक पंडित, सेक्रेटरी, पुणे झो.स.सें. यांच्या मधुर आवाजातील श्री गणेश स्तवनांने सभेची सुरुवात झाली. श्री.एन.के.जोशी, सचिव, औरंगाबाद, झो.स.सें., यांनी पुष्प गुच्छ देऊन प्रमुख व इतर पाहुणे व उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. श्री. भास्कर देशपांडे, सचिव, अहमदनगर यांनी सभेचे सूत्र संचालन केले. श्री. विलास गंधे, सर्कल सेक्रेटरी यांनी सभेच्या विषय पत्रिकेनुसार माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सभेच्या कामकाजाचा प्रारंभ केला. गेल्या वर्षीच्या वार्षिक सर्व साधारण सभेनंतर ते आजपर्यंत निधन झालेल्या सर्व सभासदांना तसेच १७ सप्टेंबर हा ''मराठवाडा मुक्ती संग्राम दिवस'' असल्याने या मुक्तीसंग्रामात ज्या देशभक्तांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे, अशा सर्वांना २ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

५. श्री. विलास गंधे यांनी बऱ्याच मान्यवरांनी पाठविलेले शुभसंदेश वाचून दाखविलेत. आपल्या स्वागतपर भाषणात ते म्हणाले की १९७४ साली अवघ्या २१ सभासदांपासून कै.ल.ना. पाबळकर यांनी संघटनेची स्थापना पुणे येथे केली. आज ह्या छोट्या रोपट्याचे मोठ्या वृक्षात रूपांतर झाले आहे.

दि.३१.०३.२०१७ रोजी पेन्शनर्स, फॅमिली पेन्शनर्स व सहसभासद मिळून ही संख्या २३,९५५ इतकी झाली आहे. सर्व सभासदांची माहिती ही कॉम्प्युटरमध्ये साठविली जाते. गेल्या वर्षी १५९५ नवीन सभासदांची नोंदणी झाली. याचे सर्व श्रेय प्रत्येक झोनल सब सेंटरचे अध्यक्ष, सचिव व सर्व कार्यकर्त्यांना त्यांनी दिले. संघटनेचे मुखपत्र म्हणून 'संवाद' नावाचे मासिक प्रकाशित करण्यात येते. संघटनेची वेबसाईट असून त्यावर बरीच माहिती वेळोवेळी दिली

जाते. दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्यास 'सुवर्ण पदक' देऊन गौरविण्यात येते. सर्व सभासदांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छापत्रे पण पाठविली जातात.

भाषणाची सांगता करतांना त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

६. आपले एक सभासद श्री. अरुण सावजी यांचा आज वाढदिवस असल्याने, नेहेमीच्या शिरस्त्याप्रमाणे श्री. विलास गंधे यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

७. श्री. प्रभाकर गुपचूप यांनी 'संवाद' साठी घेतलेल्या लेख स्पर्धेच्या विषयी सभासदांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

त्यांनी या प्रसंगी एक उत्कृष्ट कविता म्हणून दाखविली. कवितेचा सारांश असा :

'बायको चांगली. तसेच मैत्रीण केव्हाही चांगली कारण ती बायको नसते.'

या सत्याचा साक्षात्कार हा प्रत्येक माणसास होतो. परंतु हा बोध होण्यास फारच उशिर झालेला असतो. अपवाद म्हणून या गोष्टीला अपवाद नाही का ? आणि सगळ्या मुलींचं लग्नानंतर असेच होतं का ? सर्व सभासदांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात या कवितेस दाद दिली.

विजयी स्पर्धकांपैकी श्री. रत्नाकर बढे, सौ. माधुरी वाईकर, व सौ. निलीमा खरांगटे यांचा अध्यक्षांचे हस्ते बक्षिसाच्या रकमेचा चेक व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

८. 'श्री एन.जी.मोरे सर्विस अॅवार्ड' या वर्षी नागपूर येथील सर्वश्री एस.डी. उर्फ रामभाऊ कोल्हटकर व अशोक पात्रीकर यांना देण्यात आले. प्रकृति अस्वास्थ्यामुळे दोघेही हजर नसल्याने नागपूरचे अध्यक्ष श्री. साहनी यांनी वरील दोघांतर्फे श्री. उमाशंकर कोल्हे यांचे हस्ते पुरस्कार स्विकारले.

श्री. गुपचूप यांनी जी कविता म्हणून दाखविली त्याबद्दल श्री. साहनी यांनी एक गोड सूचना केली ती अशी :

'आपण आपल्या बायकोलाच आपली उत्कृष्ट मैत्रीण केली तर किती चांगले होईल? प्रत्येकाने हा विचार अंगिकारला तर प्रत्येकाचे जीवन आनंदाने बहरेल.'

श्री. सहानींच्या या सूचनेस पण सर्व सभागृहाने टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्तपणे दाद दिली हे सांगावयास नको.

९. i) वरील कार्यक्रमानंतर श्री. विलास गंधे यांनी सर्वश्री बी.जी.दांडेकर व एस.बी.गोखले यांनी केलेल्या महान कार्याचा थोडक्यात परिचय करुन दिला.

ii) श्री. दांडेकर साहेब आज ८९ वर्षाचे आहेत. या वयातही ते पेन्शनरांसाठी अत्यंत उत्साहाने व पोटतिडिकेने काम करतात. त्यांना आपल्या सर्कल असोसिशनमध्येच नाही, तर इतर सर्व सर्कल असोसिएशन मध्ये सुद्धा अत्यंत मानाचे व आदराचे स्थान आहे. आपल्या सर्कल असोसिएशनचे तसेच फेडरेशनचे सचिव व अध्यक्षपद त्यांनी अनेक वर्षे भूषविले आहे. मागच्याच वर्षी ३० मार्चला चेन्नई येथे फेडरेशनच्या सभेत त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

iii) श्री.गोखले साहेब जे आज ७८ वर्षाचे आहेत, जेव्हा ऑक्टोबर २०१६ मध्ये श्री.आर. जयरामन, (C.G.M.- H.R.) यांना हैद्राबाद येथिल Structured Meeting मध्ये पहिल्यांदाच भेटले तेव्हा त्यांनी पेन्शनर्सच्या सर्व अडचणी, कोणताही कागद जवळ न ठेवता, श्री. जयरामन यांना कथन केल्यात. ते पाहून श्री. जयरामन यांनी आश्चर्य व्यक्त केले.

५, ६ व ७ व्या बायपर्टाइटच्या पेन्शनर्स सभासदांना, सुधारीत पेन्शनची थकबाकी, मिळवून देण्यात श्री. दांडेकर व श्री. गोखले यांनी फार मोठी मोलाची कामगिरी बजावली आहे. ऑगस्ट २०१७च्या 'संवाद' मध्ये माहिती दिल्याप्रमाणे थकबाकी कशी काढायची याबाबत त्यांनी चर्चेच्या अनेक फेऱ्या कॉर्पोरेट सेंटरच्या अधिकाऱ्यांबरोबर केल्यात. बँकेने प्रसिद्ध केलेली महागाई भत्त्याबद्दलची अनेक दुर्मिळ परिपत्रके त्यांनी बँकेत दिलीत. या सर्व गोष्टीमुळे सभासदांना थकबाकी मिळू शकली.

iv) सर्वश्री दांडेकर व गोखले या दोघांचा, या वयातही ते ज्या कळकळीने पेन्शनर्स सभासदांना मदत करीत आहेत, या त्यांच्या समर्पित वृत्तीचा आदर व्यक्त करण्यासाठी, श्री. उमाशंकर कोल्हे यांचे हस्ते अत्यंत हृद्य सत्कार करण्यात आला. सर्व सभासदांनी या सत्काराप्रसंगी उभे राहून टाळ्यांच्या गजरात दोघांनाही मानवंदना दिली.

v) सत्कारास उत्तर देतांना श्री. दांडेकर म्हणाले 'मी १९८८ सालापासून असोसिएशनचे काम करीत आहे. मी जेव्हा फेडरेशन व मुंबई झो.स.सें चा सेक्रेटरी होतो तेव्हां कामाचा खूप ताण असल्याने श्री.गोखले यांना मुंबई झो.स.सें चे सेक्रेटरी म्हणून घेतले. श्री. गोखले यांनी माझा विश्वास सिद्ध करुन दाखविला. कारण ते कामाशी अत्यंत प्रामाणिक आहेत, कष्टाळू आहेत व पेन्शनर्ससाठी मी हे काम का करायचे असे त्यांच्या मनात ही येत नाही.

बऱ्याच लोकांनी व्ही.आर.एस. घेतल्यानंतर श्री. गोखले यांनी २००० सभासदांची नोंदणी केली व रु.२० लाखाच्या वर देणग्या मिळविल्यात. सध्या ते फेडरेशनचे उपाध्यक्ष आहेतच. यानंतर त्यांनी फेडरेशनचे अध्यक्षपद भूषवावे ही इच्छा श्री. दांडेकरांनी व्यक्त केली. सर्व सभासदांनी टाळ्या वाजवून या इच्छेस मान्यता दर्शविली.

vi) यानंतर श्री. साहेबराव देसाई अध्यक्ष, औरंगाबाद झो.स.सें. यांचा पण सन २०१६-१७ चा 'मराठा भूषण पुरस्कार' मिळाल्याबद्दल श्री.कोल्हे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री. साहेबराव देसाई यांनी याबाबतचे सर्व श्रेय त्यांचे आई वडिल व सहकाऱ्यांना दिले.

१०.कल्याण-डोंबिवली युनिटचे सचिव व मुंबई झो.स.से. चे कोषाध्यक्ष श्री.सुभाष आगरकर वय - ७५ व धुळे युनिटचे अध्यक्ष श्री. सोमनाथ दीक्षित (वय-७३) यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल ''कै. वासुदेव विठ्ठल गंधे व कै. उमाबाई वा. गंधे'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री.बी.जी.दांडेकर यांनी पारितोषिक व प्रत्येकी रु.५००१/- चा चेक देऊन दोघांना सन्मानित केले.

श्री. दीक्षित यांनी त्यांच्या सन्मानाचे सर्व श्रेय आईवडिल व आपल्या सर्व सहकाऱ्यांना दिले. श्री. साहेबराव देसाई यांनी हा कार्यक्रम संचलित केला. कै. मंगेश पाडगावकरांची एक सुंदर कविता त्यांनी सभासदांना ऐकविली. या कवितेचा सारांश - 'माणसाचा जन्म हे त्याच्या पुस्तकरूपी आयुष्याचे पहिले पान असते. शेवटचे पान मृत्यू असते. मधली पाने हे त्याचे कर्तृत्व असते. ही पाने त्याने स्वतः भरायची असतात.'

सर्व उपस्थितांनी टाळ्या वाजवून या कवितेबद्दल कौतुक व्यक्त केले.

११. या नंतर 'कै.ल.ना.पाबळकर सुवर्ण पदक' प्रदान करण्याचा कार्यक्रम झाला. श्री. गोखले यांनी माहिती दिली की हे पदक खूप मानाचे असून उत्कृष्ट काम करणाऱ्यासच दरवर्षी दिले जाते. यावेळच्या पदकाचे मानकरी कै.पी.एम.नारकर, माजी अध्यक्ष पणजी, झो.स.सें. हे आहेत.

जेव्हा हा निर्णय आमच्या कमिटीने मे २०१७ मध्ये घेतला, तेव्हा ते हयात होते. दुर्दैवाने दि.११ जुलै २०१७ला त्यांचे दुःखद निधन झाले.

श्री. नारकर हे १० वर्षे पणजी झो.स.सें. चे अध्यक्ष होते. ते उप महा प्रबंधक म्हणून निवृत्त झाले. सर्वांना मदत करण्याची त्यांची वृत्ती होती. असोसिएशनचे हॉलिडे होम पणजी येथे स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

पणजी झो.स.सें. चे सचिव श्री. ऐझॅक डायस, यांनी हा पुरस्कार श्रीमती पी.पी.नारकर यांचे तर्फे स्विकारला.

(दि.१२ ऑक्टोबर २०१६ रोजी पणजी येथे एका कार्यक्रमात श्री. गोखले यांचे हस्ते हा पुरस्कार श्रीमती नारकर यांनी स्विकारला.)

१२. वरील कार्यक्रमानंतर श्री. सुनिल शिंदे, स.म.प्र. व सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशन औरंगाबाद झोन, यांनी सर्वश्री दांडेकर व गोखले यांच्या कडे पाहून काम करण्याची स्फूर्ति मिळते, असे सांगितले. तसेच पेन्शनर्सचे प्रश्न हे खूप वेगळे आहेत व त्यांना आमच्यापेक्षा जास्त असोसिएशनची व सबळीकरणाची गरज आहे.

श्री. महेश गोसावी, सचिव, स्टेट बँक कर्मचारी संघटना औरंगाबाद झोन यांनी पेन्शनर्स असोसिएशनला शुभेच्छा दिल्यात व ५०व्या वार्षिक सभेस, सभासद म्हणून हजर राहील असे त्यांनी आवर्जुन सांगितले.

श्री. उमाशंकर कोल्हे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविल्याबद्दल असोसिएशनचे आभार मानले व बँक आपल्या पेन्शनर्सलाही कामाची संधी देते असे सांगितले. त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

१३. यानंतर विषय पत्रिकेप्रमाणे सभेमध्ये खालील विषयास एकमताने मंजुरी दिली गेली.

i) ४२ व्या सभेच्या कामकाजाचा विस्तृत वृत्तांत.

ii) २०१६-२०१७ चा आर्थिक ताळेबंद

iii) सर्कल मॅनेजिंग कमिटीच्या संघटनेच्या कार्याबद्दलचा मागील वर्षाचा आढावा.

iv) नेहेमीचे ठराव.

१४. ५, ६ व ७व्या बायपर्टाईटच्या पेन्शनर्सना थकबाकी मिळाल्याबद्दल त्यांच्याकडून संघटनेस देणगी देण्याबद्दल 'संवाद' मधून आवाहन करण्यात आले होते. खालील कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न करुन चांगल्याप्रकारे देणग्या गोळा केल्याबद्दल श्री.गोखले यांचे हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

i) श्री. त.म.पाटील, सोलापूर - रु.६.१० लाख

ii) श्री. भास्कर देशपांडे, अहमदनगर - रु.३.३८ लाख

iii) श्री. आर एस. राजीवडेकर, मुंबई -रु.५.७८ लाख

iv) श्री. व्ही.आर. बावीसकर, जळगाव -रु.१.५७ लाख

v) श्री. अविनाश निमदेव, अमरावती - रु.१.५६ लाख

vi) श्री. बी. सी. ठाकूर, नाशिक - ०.४९ लाख

१५. आपले मुंबईचे एक कार्यकर्ते श्री. माधव नाडकर्णी, सचिव, मुंबई, झो.स.सें. यांनी लिहिलेल्या ''पाहिले म्या डोळा'' या पुस्तकाचे श्री.बी.जी.दांडेकर यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

१६.दुसऱ्या सत्रात ''बँकेची पेन्शनर्स मीट'' घेण्यात आली. श्री. चंद्रकांत कुळकर्णी, अध्यक्ष, पुणे, झो.स.सें, यांनी पेन्शनर्स व बँकेच्या दवाखान्या संबंधीत महत्वाचे मुद्दे तसेच येणाऱ्या अडचणी याविषयी कथन केले. सौ. सुनिता पुराणिक, मुख्य प्रबंधक (H.R.) औरंगाबाद झोनल ऑफिस, यांनी पेन्शनर्स प्रति सहानुभूति व्यक्त केली व मदत करण्याची तयारी दाखविली. श्री. भूषण वेताळ यांनी बँकेने तयार केलेल्या 'Fund Transfer' या नवीन सेवेसंबंधी माहिती दिली.

त्याचप्रमाणे एस.बी.आय. लाईफचे श्री. मेहता यांनी त्यांच्या काही विमा पॉलिसी संबंधात थोडक्यात माहिती दिली.

१७. श्री.एस.बी.गोखले, अध्यक्ष, यांनी त्यांच्या भाषणात ''बँक ऑफ बॉम्बे'' असल्यापासून (सुमारे २०० वर्षापूर्वीपासून) पेन्शन सुरू असल्याची माहिती दिली. जवळ जवळ ६० वर्षे पेन्शनमध्ये वाढ न झाल्याने १९८७ साली I.B.I. पेन्शनर्स असोसिएशनने सुप्रिम कोर्टात बँकेविरुद्ध दावा दाखल केला. १९८९ साली त्याचा निकाल पेन्शनर्सच्या बाजूने लागला व जास्तीत जास्त पेन्शन रु.१३००/- (अॅवॉर्ड स्टाफ) व रु.२७००/- (ऑफिसर्स) असे दि. १ जानेवारी १९८६ पासून लागू झाले.

त्यानंतर ५, ६ व ७व्या बापर्टाइट मध्ये पेन्शनविषयी सविस्तर माहिती त्यांनी दिली. त्याचप्रमाणे ५व्या बायपर्टाइटच्या पेन्शनर्सना रु.३७७५/- च्या ऐवजी रु.२४००/-च पेन्शन दिले जात असल्याची खंत व्यक्त केली. श्री गोखले यांनी सध्या दिल्ली हायकोर्ट मध्ये सुरू असलेल्या (५०% पेन्शनची मागणी केलेल्या) दाव्यासंबंधी तसेच १००% डिअरनेस रिलिफ न्युट्रलायझेशन बद्दल सविस्तर माहिती सांगितली.

३०% फॅमिली पेन्शन व १/११/२००२ पूर्वी निवृत्त झालेल्यांना १००% डि.रि.न्युट्रलायझेशन, हे इंडियन बँक असोसिएशनच्या विचाराधीन असून त्याबद्दलचा अपेक्षित निर्णय लवकरच होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

फेडरेशनने दाखल केलेल्या ५०% पेन्शन संदर्भात जी 'मुरुमू कमिटी' सरकारने नेमली होती त्याबद्दलपण सविस्तर चर्चा केली.

५, ६ व ७ व्या बायपर्टाईटच्या पेन्शनर्सना थकबाकी मिळणे सुरू झाले आहे. पण बऱ्याच पेन्शनर्सनी अद्याप PAN, तसेच Life Certificate न दिल्याने त्यांना थकबाकी मिळणे त्रासदायक आहे. फॅमिली पेन्शनर्सच्या बाबतीत थकबाकी देतांना काय कागदपत्रे घ्यावयाची याची चर्चा चालू असून बँकेने त्याबद्दल अजून निर्णय घेतला नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जेथे पेन्शनर व फॅमिली पेन्शनर असे दोघेही मयत आहेत अशा केसेस मध्ये कागदपत्रांची पूर्तता लवकर केल्यास थकबाकी मिळण्यास होणारा त्रास कमी होऊ शकतो.

पेन्शनर्सने आपले पेन्शन खाते बायको/नवऱ्याचे नावांने 'जॉईंट खाते' करून घ्यावे म्हणजे फॅमिली पेन्शन मिळण्यास त्रास होणार नाही हे पण त्यांनी आवर्जुन सांगितले.

१८. श्री. गोखले यांनी त्यांचे भाषण झाल्यानंतर, ज्या पेन्शनर्सनी काही प्रश्न विचारले त्यांना समर्पक उत्तरे दिलीत. श्री. आंबेकर यांनी आभार प्रदर्शन केले. सभेची सांगता धुळे येथिल सभासद श्री. कासार यांनी गायलेल्या पसायदानाने झाली.

१९. दोनही सभा उत्कृष्टपणे व अत्यंत उत्साहात पार पडल्याचे समाधान बऱ्याच जणांनी व्यक्त केले. जेवण, चहा, नाश्ता निवास व्यवस्था तसेच संपूर्ण सभेची व्यवस्था, उत्कृष्टपणे केल्याबद्दल श्री. साहेबराव देसाई, श्री. एन.के. जोशी व औरंगाबादच्या सर्व कार्यकर्त्यांचे विशेष आभार मानून सर्वांनी धन्यवाद दिलेत.

विलास गंधे, सचिव

**LONG LIVE THE VETERANS OF SBIPA**
**NAMES OF MEMBERS WHO HAVE COMPLETED / WILL BE COMPLETING 90 YEARS OF AGE IN THE CURRENT YEAR & WHOSE BIRTHDAY FELL / FALLS DURING OCT 2017 TO DEC 2017**

| Memb. No. | NAME | DISTRICT | DATE OF BIRTH |
|---|---|---|---|
| PM/0840 | MR. J. J. GOR | MUMBAI | 04/10/1927 |
| APM/5752 | SMT.PRATIBHA LAXMIKANT HALVE | NASHIK | 10/10/1927 |
| LM/0792 | MR. G. R. KASHELIKAR | MUMBAI | 12/10/1927 |
| LM/2626 | MR SHRINIVAS ARAVAMADHAN | PUNE | 15/10/1927 |
| PM/0821 | MR.MANOHAR GOVIND BHALE | MUMBAI | 27/10/1927 |
| LM/1022 | MR. M. H. SHAIKH (GAVANDI) | KOLHAPUR | 09/11/1927 |
| LM/0778 | MR.RANGRAO A. WANKHEDE | AMRAVATI | 10/11/1927 |
| LM/0913 | MR.RAMCHANDRA R. PALANDE | MUMBAI | 02/12/1927 |

***Birth Day Greetings have already been / are being sent to the above Members. We congratulate all these Members and wish them long and healthy life. ———- Secretary***

**Unit Varta: Ahmednagar Unit :**

The AGM of the Unit took place on 18th August 2017 at Patiala House, Ahmednagar. Nearly 150 members from different places in the District attended the Meeting. The Meeting was addressed by Shri Vilas Gandhe, Circle Secretary, who enlightened the participants about the latest position of our Court Case, disbursement of arrears to 5, 6, and 7th BPS pensioners etc. He also appealed the members for donation to the Association for which the response was spontaneous and tremendous as total donations to the tune of Rs.2.88 lacs were received from 32 Members on that day. A few Members who donated more than Rs.5000/- were felicitated. The following members donated Rs. 10,000/- and above in response to the appeal of the Association.

i) Shri B. G. Apshankar, Rs.21,000/-. ii) Shri T.E. Waikar, Rs.21,000/-.
iii) Shri M. B. Markad, Rs.11,111/-. iv) Shri Vasant K. Gawade, Rs.10,000/-

Shri Vasant K. Gawade, retired as an award staff employee (promoted from Messenger's category) and despite receipt of comparatively small amount of arrears donated the above amount. For this large hearted gesture, he received special appreciation in this Meeting.

Shri C. P. Kulkarni, President, Pune ZSC, and Shri Ashok Pandit, Secretary, Pune ZSC also addressed the participants. Shri D. A. Kulkarni, Circle Treasurer, was also present.

Shri Bhaskar Deshpande, Secretary, Ahmednagar District, presented the activities undertaken by the unit during the year. Shri S. R. Joshi, President, Ahmednagar District, briefed about the overall performance of the Unit. Shri Jayant Joshi, Treasurer, Ahmednagar District, presented the 'Receipt and Payment Statement' for the year 2016.2017. On this occasion 10 pensioners retired from SBH were enrolled as Members of the Association and were felicitated.

The AGM was followed by the 'Bank's Pensioners' Meet' which was attended and addressed by Sarvashri Dinkar Warang, AGM, RBO, Meghashyam Injewar, AGM, Ahmednagar Branch, R. S. Desai, C.M. RBO, Dhananjay Kalekar, Manager, RBO, Y.T. Amrut, Manager, Ahmednagar Branch, Kiran Prabhu, B.M. Burudgaon branch, and Mrs. Prabhakumari Pavaskar, B. M. Gulmohor Road Branch. All the above officials were felicitated. They promised to offer good service to the pensioners and look in to their problems with concern.

Shri Sadanand Bhanage, compered the prograamme in a very lucid language. Shri Ashok Navale, extended vote of thanks. The meeting was concluded after lunch.

*- Bhaskar Deshpande, Secretary*

**APPEAL FOR DONATION TO THE BENEFICIERIES OF 5th, 6th, & 7th BPS**

Dear Members,

We refer you to our appeal made in 'Samvad' for August 2017 for donating generously to the Association. We have been receiving good response for this appeal and we convey our sincere thanks to all such donors. Although few of our Pensioners are yet to receive the arrears for some reason or the other and some delay has taken place in getting the arrears credited to the beneficiaries' accounts due to large number of beneficiaries, we observe that still, a good number of our Members who are in receipt of the arrears, has so far not responded to our appeal made fervently in this regard. These donations may be looked as a mark of respect to all those stalwart persons since establishment of the Association, who have dedicated their life, labor, time and money for fighting to get justice to all our Members.

Our Office Bearers have been contacting the Members personally for collecting the donations wherever possible. However, at some places, particularly in large cities like Mumbai, Navi Mumbai, Pune, Nagpur it may not be possible to call on each and every Member personally. Dear Members, we once again fervently request to come forward and respond to our sincere request positively.

Wishing you good health and happiness in your life.

***- Secretary***

(We are publishing hereunder a Circular No. RBI/2017-18/89, - DBR. No. Leg. BC. 96/09.07.005/ 2017-18 November 9, 2017, issued by Reserve Bank of India for information of our Members)

*******************************************************

**Statement on Developmental and Regulatory Policies - October 4, 2017-**
**Banking Facility for Senior Citizens and Differently abled Persons**

Please refer to Paragraph 8 of Statement on Developmental and Regulatory Policies, released by Reserve Bank of India on October 4, 2017 as part of Fourth Bi-monthly Monetary Policy Statement 2017-18, a copy of which is enclosed. It has been observed that there are occasions when banks discourage or turn away senior citizens and differently abled persons from availing banking facilities in branches. Notwithstanding the need to push digital transactions and use of ATMs, it is imperative to be sensitive to the requirements of senior citizens and differently abled persons.

2. In view of the above, banks are required to put in place appropriate mechanism with the following specific provisions for meeting the needs of such customers so that they are able to avail of the bank's services without difficulty.

(a) Dedicated Counters/Preference to Senior Citizens, Differently abled persons Banks are advised to provide a clearly identifiable dedicated counter or a counter which provides priority to senior citizens and people who are differently abled including visually impaired persons.

(b) **Ease of submitting Life Certificate**

As per extant guidelines issued by Department of Government and Bank Accounts, in addition to the facility of Digital Life Certificate under "Jeevan Praman" Scheme (refer circular DGBA.GAD.H-2529/45.01.001/2014-15 dated December 9, 2014), pensioners can submit physical Life Certificate form at any branch of the pension paying bank. However, it is observed that often the same is not updated promptly by the receiving branch in the Core Banking Solution (CBS) system of the bank, resulting in avoidable hardship to the pensioners. It is, therefore, advised that banks shall ensure that when a Life Certificate is submitted in any branch, including a non-home branch, of the pension paying bank, the same is updated/ uploaded promptly in CBS by the receiving branch itself, to avoid any delay in credit of pension.

(c) **Cheque Book Facility**

(i) Banks shall issue cheque books to customers, whenever a request is received, through a requisition slip which is part of the cheque book issued earlier.

(ii) Banks are advised to provide minimum 25 cheque leaves every year, if requested, in savings bank account, free of charge.

(iii) Banks shall not insist on physical presence of any customer including senior citizens and differently abled persons for getting cheque books.

(iv) Banks may also issue cheque books, on requisition, by any other mode as per bank's laid down policy.

It is further clarified that providing such facility in BSBDA will not render the account to be classified as non-BSBDA (c.f. Bank's response to query number 14 and 24 of our circular "DBOD.No. Leg. BC.52/09.07.005/2013-14 dated September 11, 2013 on Financial Inclusion - Access to Banking Services - BSBDA - FAQs").

(d) **Automatic conversion of status of accounts**

Presently, in some banks, even fully KYC - compliant accounts are not automatically converted into 'Senior Citizen Accounts' on the basis of date of birth maintained in the bank's records. Banks

are advised that a fully KYC compliant account should automatically be converted into a 'Senior Citizen Account' based on the date of birth available in bank's records.

(e) **Additional Facilities to visually impaired customers**

Banks are advised that the facilities provided to sick/old/incapacitated persons vide Paragraph 9 of our Master Circular DBR.No.Leg.BC.21/09.07.006/2015-16 dated July 1, 2015 on Customer Service in Banks (regarding operations of accounts through identification of thumb/ toe impression/mark by two independent witnesses and authorising a person who would withdraw the amount on behalf of such customers) shall also be extended to the visually impaired customers.

(f) **Ease of filing Form 15G/H**

Banks are advised to provide senior citizens and differently abled persons Form 15G/H once in a year (preferably in April) to enable them to submit the same, where applicable, within the stipulated time.

(g) **Door Step Banking**

We have issued instructions on Doorstep Banking vide circular DBOD.No.BL.BC.59/ 22.01.010/ 2006-2007 dated February 21, 2007 under Section 23 of Banking Regulation Act, 1949. However, in view of the difficulties faced by senior citizens of more than 70 years of age and differently abled or infirm persons (having medically certified chronic illness or disability) including those who are visually impaired, banks are advised to make concerted effort to provide basic banking facilities, such as pick up of cash and instruments against receipt, delivery of cash against withdrawal from account, delivery of demand drafts, submission of Know Your Customer (KYC) documents and Life certificate at the premises/ residence of such customers.

3. Banks are advised to implement these instructions by December 31, 2017 in letter and spirit and give due publicity in their bank branches and website.

*************************************************************************

**Statement on Developmental and Regulatory Policies, Reserve Bank of India issued by the Governor on October 4, 2017**

8. **Banking Facility for Senior Citizens and Differently abled Persons**

It has been reported that banks are discouraging or turning away senior citizens and differently abled persons from availing banking facilities in branches. Notwithstanding the need to push digital transactions and use of ATMs, it is imperative to be sensitive to the requirements of senior citizens and differently abled persons. It has been decided to instruct banks to put in place explicit mechanisms for meeting the needs of such persons so that they do not feel marginalised. Ombudsmen will also be advised to pay heed to complaints in this context. Necessary instructions in this regard will be issued by end-October 2017.

## सामाजिक बांधिलकी

अहमदनगर येथील सभासद श्री. अशोक नवले यांनी, तेथील पटवर्धन स्मारकाच्या बागेत चालणाऱ्या 'बाल संस्कार' शिबिरातील लेझीम शिवाय लेझीमचा सराव करणाऱ्या मुलामुलींना ३० लेझीमचा संच भेट म्हणून दिला. त्यामुळे मुलामुलींच्या चेहऱ्यावरील हसू व आनंद पाहून सर्वांना आनंद झाला. त्याचप्रमाणे कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांची मुले शिकत असलेल्या एका बालक मंदिराला श्री. नवले यांनी रु. १०,०००/- च्या रकमेचे खेळाचे साहित्य भेट स्वरूपात दिले. श्री. नवले यांच्या सामाजिक बांधिलकीच्या जपणुकीबद्दल अभिनंदन व शुभेच्छा!

श्री. भास्कर देशपांडे, सचिव, अहमदनगर

(We publish hereunder two letters No. CC/6 and CC/7 - 2017-18, both Dt. 06th Nov 2017, sent by our Federation to the DMD & CDO, SBI, the contents of which are self- explanatory. ……….Secretary)

*************************************************************************************

**REALIGNMENT OF PENSION ISSUE**
**REALIGNMENT OF PENSION TO 8TH BPS RETIREES**
**FROM 1ST NOVEMBER 2002 TO 30TH APRIL 2005**

We submit that our Bank while recommending for realignment of pension to the staff retired from 1st November 1987 to 30th April 2005 covering the Bipartite Settlements of 5th to 8th bps. Government of India vide their letter dated 20th April 2017 gave consent to the proposal of realignment of pension to 5th to 7th BPS retirees made by the Bank but did not give approval for shifting of date from 1-5-2005 to 1-11-2002 to 8th BPS retirees as recommended by the Bank.

Now, 80% of the retirees received arrears due to revision of pension from the date of their retirement except the retirees under 8th BPS, especially retired during the period 1-11-2002 to 30-4-2005. The reason being the retirees of 7th BPS were paid pension based on 6th BPS pay scales and similarly the retirees under 8th BPS were also paid pension based on 6th BPS pay scales for the period 1-11-2002 to 30-4-2005 as there was no revision of pension for 7th BPS retirees and the retirees under 8th BPS got their revised pension from 1st May 2005. The issue is, though the 7th BPS retirees got arrears of payment of pension, the retirees under 8th BPS did not get pension as per their eligibility for the period 1-11-2002 to 30-4-2005 and they continue to draw pension on 6th BPS pay scales. This position has become more anomalous so there is an immediate need to review the position and revise the pension of 8th BPS retirees for the period under reference, as their position is worse than any other retiree in SBI.

The Notification issued by State Bank of India dated on 4th October 2017 provides for realignment of pension to those staff retired on or before 30th April 2005

Kindly do the needful.

***********************************************************************

**DEMAND LOAN**
**LOAN AGAINST PENSION TO THE PENSIONERS**
**INSURANCE COVER TO THE LOAN AMOUNT**

We have to advise that Demand Loan is being sanctioned by the Bank to the retirees against pension payable to him/her every month which is recoverable in equal monthly installments as per age of the pensioner. The loan amount is guaranteed by spouse of the retiree in all the cases or a third party acceptable to the Bank, in the absence of spouse. Wherever, there are cases of death of principal pensioner, the amount is recovered from the family pensioner every month, from the meagre family pension paid to her/him or from the guarantor.

In order to ensure repayment of loan in such circumstances, we propose the Bank to examine the feasibility of taking suitable insurance cover for the currency period of the loan. In case of any unfortunate eventuality the insurance cover takes care of liquidation of the said loan. This enables the family pensioner to have a great financial relief, so far, for recovery of loan sanctioned to the pensioner, during the rest of her/his life.

We hope that our proposal will receive Bank's due and humane consideration, as this type of cover is already available for Housing Loans sanctioned to the employees by the Bank.

********************************************************

## काळ आला होता, पण वेळ आली नव्हती

दि. २२ नोव्हेंबर २०१६ रोजी मी स्वतः, सर्वश्री चंद्रकांत कुलकर्णी अध्यक्ष पुणे, झो.स.सें, अशोक पंडीत सचिव, पुणे झो.स.सें व प्रमोद चाटे, नाशिक युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा आटोपून पुण्यास परत येत होतो. संध्याकाळी ७.३० च्या सुमारास संगमनेरच्या १० कि.मी. अलिकडे आमच्या समोरुन येणारी एक कार एकदम 'U Turn' घेऊन आमच्या गाडीसमोर अचानक येऊन आडवी थांबली. त्या मोटारीच्या चालकाचे आमची कार येत आहे याकडे लक्षच नव्हते व जसे लक्षात आले तशी त्याने ब्रेक लावून त्याची कार घाबरुन वाटेतच थांबविली. ती कार अंदाजे आमच्या कारपासून जेमतेम १००/१५० फुटावरच थांबली होती. आमच्या टॅक्सीच्या चालकाने प्रसंगावधान राखून जोरात ब्रेक दाबले पण शेवटी आमची टॅक्सी त्या कारच्या मागच्या दारावर आदळलीच. आमच्या चालकाने प्रसंगावधान राखून गाडी पुष्कळच नियंत्रणात आणली. त्यामुळे सुदैवाने आमच्यापैकी कोणाला कसलीच इजा झाली नाही पण आमच्या टॅक्सीचे बॉनेट चेपले गेले, चाक पंक्चर होऊन बरेच नुकसान झाले. समोरच्या कारचे विशेष नुकसान झाले नाही व तो चालक कार घेऊन लगेच पळून गेला.

काही वेळ आम्हाला काहीच सुचेना. नंतर टॅक्सी रस्त्याच्या कडेस कशीतरी लावून आम्ही महत्प्रयासाने संगमनेर पोलीस स्टेशनला आलो. सुदैवाने श्री. चाटेंकडे संगमनेर येथील आपले पेन्शनर सर्वश्री एस्. आर. ताजने, एस्. एम्. बिबवे व एस्. बी. जोशी यांचे फोन नंबर्स होते. फोन केल्यावर हे तिघेही जण लगेचच पोलीस स्टेशनमध्ये आम्हास भेटण्यास आले. श्री. बिबवे यांनी सोबत पैसे पण आणले होते. त्यांच्या मुलाचे तेथे हॉस्पिटल असल्याने त्यांनी आम्हास तेथे चलण्याची विनंती केली. सुदैवाने कोणासही शारीरिक इजा न झाल्याने तेथे जाण्याची वेळ आली नाही. पोलीसस्टेशनचे सोपस्कार होईपर्यंत रात्रीचे ११ वाजले होते. श्री. बिबवे व इतरांनी आम्हास जेवणाचा आग्रह केल्याने थोडी पेटपूजा करुन आम्ही रात्री १२/१२.३० वा. बसने निघून पहाटे पुण्यास पोहोचलो.

श्री. बिबवे व इतर पेन्शनर बंधू वेळेवर आमच्या मदतीस धावून आले त्यामुळे त्यांचे कितीही आभार मानले तरी कमीच आहेत. शेवटी स्टेट बँक (कर्मचारी अथवा पेन्शनर) हे एक मोठे कुटुंबच आहे याचा पुन्हा प्रत्यय आला. देवाच्या कृपेनेच आम्ही सर्व वाचलो होतो.

येथे नमूद करण्यास अत्यंत वाईट वाटते की श्री बिबवे यांचा मुलगा, डॉ. किरण, M.S. [ortho] यांचे नुकतेच ३ महिन्यापूर्वी अकस्मात निधन झाले. आम्ही सर्व त्यांचे दुःखात सहभागी आहोत. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांती देवो. शेवटी कोणाच्या नशिबात काय लिहिले असते ते परमेश्वरालाच माहित. अखेर 'ईश्वरेच्छा बलियसी' हेच खरे.

विलास गंधे, सचिव

### श्री. एस. एन. स्वामी यांचा प्रामाणिकपणा

दि. १७ सप्टेंबर २०१७ रोजी आपल्या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा औरंगाबाद येथे अत्यंत उत्साहात चालू होती. सभेचे आयोजन करण्याऱ्यापैकी आपले एक कार्यकर्ते श्री. एस. एन. स्वामी यांना मुख्य सभागृहात रु. ५०००/- सापडले त्यांनी ते लगेच श्री. भास्कर देशपांडे, सूत्र संचालक, यांचेकडे आणून दिलेत. श्री. देशपांडे यांनी २-३ वेळेस याची माहिती सभागृहात दिली. ज्या सभासदाचे पैसे होते त्यांनी नोटांचे विवरण सांगितल्यावर त्यांना त्यांचे पैसे परत करण्यात आले.श्री. स्वामी यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणा-बद्दल संघटनेतर्फे त्यांचे अभिनंदन.

विलास गंधे, सचिव

### दुवा

तुझे राहू दे
माझे राहू दे
त्याच्यासाठी तरी एकत्र येऊ---
तुझ्या माझ्या भांडणात
अहम् मोठा कुणाचा?
त्यापेक्षा तो नाही का मोलाचा?
दुरावलो दोघे एकमेका
सरावलो नव्या आयुष्याला
त्याचा मात्र जीव दुखावला---
एकदा तरी ऐक आता,
तुझे मीही ऐकणार आहे
तोच दोघा जोडणारा दुवा आहे---
त्याचे हसणे, त्याचे रुसणे
त्याला जपत आपले जगणे
हाच आयुष्याचा अर्थ आहे!

५२/१७

सदानंद गोखले, पुणे
मो. ९९२२९१३३१५

**Payment of ad-hoc arrears to the Pensioners / Family Pensioners of the 5th, 6th & 7th Bipartite Settlements.**

**List of members who have given Donations for *'LEGAL FUND'* on receipt of arrears**

(Kindly refer earlier list printed in 'Samvad' for September 2017)

**We are thankful to the following members & request others to Donate for Legal Fund**

*********************************************************************

| NAME | AMOUNT |
|---|---|
| MR.RAVINDRA SHERIKAR | 26,500 |
| MR.D.RAMLINGAM | 20,001 |
| MR.SHRIVALLABH PRABHUDESAI | 15,000 |
| MR.RAMCHANDTRA V.KAMAT | 11,111 |
| MR.ARVIND D.MAHAJAN | 11,101 |
| MR.D.K.VISHVE | 11,101 |
| SMT.ANITA D.TARKAR | 11,001 |
| MR.KRANTISEN ATHAVALE | 11,000 |
| MR.SHANTILAL GADIYA | 11,000 |
| MR.C.V.GUJRATHI | 11,000 |
| MR.MANOHAR B.LIMAYE | 11,000 |
| MR.M.M.MASHALKAR | 11,000 |
| MR.SHARAD D.MHATRE | 11,000 |
| MR.ATMARAM M.KINI | 10,251 |
| MR.PRABHAKAR APTE | 10,001 |
| MR.SONU F.TENDULKAR | 10,001 |
| MR.PUNDALIK ANVEKAR | 10,000 |
| MR.SHRIKANT ASNODKAR | 10,000 |
| MR.NANA AUTI | 10,000 |
| MR.MOHAN BAKSHI | 10,000 |
| MR.RAGHUVEER BALSE | 10,000 |
| MR.SUDHAKAR N.BARGIR | 10,000 |
| MR.MANOHAR BHALERAO | 10,000 |
| MR.ASHOK BHEMBRE | 10,000 |
| MR.MANECK BOYWALLA | 10,000 |
| MR.NARAYAN CHAULKAR | 10,000 |
| MR.GAJANAN DEO | 10,000 |
| MR.SHREEDHAR DEOGHARE | 10,000 |
| MR.VASANT DHUPKAR | 10,000 |
| SMT.INDRANI S.DIGIKAR | 10,000 |
| MR.ANIL GADKARI | 10,000 |
| MR.L.G.GANDHI | 10,000 |
| MR.VAIKUNTH INGALE | 10,000 |
| MR.MANOHAR JAMADAR | 10,000 |
| MR.RAMESH JOSHI | 10,000 |
| MR.MADHAV JOSHI | 10,000 |
| MR.MADANLAL KABRA | 10,000 |
| MR.UPENDRA M.KINI | 10,000 |
| MR.VASANT N.KULKARNI | 10,000 |
| MR.JAYANT J.KULKARNI | 10,000 |
| MR.VIJAYKUMAR KURHEKAR | 10,000 |
| SMT.MADHAVI S.LAD | 10,000 |
| MR.RAGHUNATH MAHABAL | 10,000 |
| MR.N.P.MURKUTE | 10,000 |
| MR.SHRINIWAS PADALIKAR | 10,000 |
| MR.SATISH PHANSALKAR | 10,000 |
| MR.S.K.PHANSE | 10,000 |
| MR.B.G.PUROHIT | 10,000 |
| MR.S.RAJGOPALAN | 10,000 |
| MR.VIDYADHAR RANE | 10,000 |
| MR.ASHOK SANYAL | 10,000 |
| MR.GANESH K.SHINDE | 10,000 |
| MR.BIMALCHANDRA SINHA | 10,000 |
| MR.B.N.TAMOLI | 10,000 |
| MR.SHRIKANT VAIDYA | 10,000 |
| MR.G.VAIDYANATHAN | 10,000 |
| MR.P.R.VISHWANATHAN | 10,000 |
| MR.MADHUKAR VITHAL | 10,000 |
| A WELLWISHER | 10,000 |
| A WELLWISHER | 10,000 |
| MR.P.R.BUWA | 8,000 |
| MR.SHARAWAN CHOUDHARI | 8,000 |
| MR.PRABHAKARAN K.V. | 8,000 |
| MR.SHANTARAM KOLTE | 7,500 |
| MR.CHANDRAKANT A.KULKARNI | 7,500 |
| MR.D.P.MADKAIKAR | 7,500 |
| MR.D.S.SONJE | 7,500 |
| SMT.SWATI V.GARDE | 6,101 |
| SMT.PALLAVI BREED | 6,000 |

| | |
|---|---|
| SMT.MOZEL DANIEL | 6,000 |
| MR.ARVIND PATHAK | 6,000 |
| MR.C.B.PIMPALKAR | 5,500 |
| MR.ASHOK D.ARYAMANE | 5,001 |
| MR.SATISH D.BRAHME | 5,001 |
| MR.SUDHAKAR GOKHALE | 5,001 |
| MR.MADHU RANADE | 5,001 |
| MR.AVINASH D.BAGDE | 5,000 |
| MR.KRISHNA BAGADE | 5,000 |
| MR.VAMAN BELE | 5,000 |
| MR.R.D.CHITALE | 5,000 |
| MR.VINOD DATE | 5,000 |
| SMT.ANAGHA A DESHMUKH | 5,000 |
| MR.S.K.DESHPANDE | 5,000 |
| MR.BHIMSEN DHOPATKAR | 5,000 |
| MR.P.H.DINGANKAR | 5,000 |
| MR.ASHOK DIXIT | 5,000 |
| MR.MADHUKAR GAIDHANI | 5,000 |
| MR.N.M.GAIKWAD | 5,000 |
| MR.N.Y.GARUD | 5,000 |
| MR.PRABHAKAR GAWAI | 5,000 |
| MR.CHANDRAKANT GHADI | 5,000 |
| SMT.MEENA P.GODBOLE | 5,000 |
| MR.P.R.GUPCHUP | 5,000 |
| MR.DAMODAR R.JOSHI | 5,000 |
| SMT.ANJALI JOSHI | 5,000 |
| MR.G.N.JOSHI | 5,000 |
| MR.S.T.KASHID | 5,000 |
| MR.KAMLAKAR S.KASTURE | 5,000 |
| MR.KATTI | 5,000 |
| MR.RAGHUNATH KHARE | 5,000 |
| MR.PADMAKAR S.KULKARNI | 5,000 |
| MR.A.S.KULKARNI | 5,000 |
| SMT.MANJU LALWANI | 5,000 |
| MR.SADASHIV MALVANKAR | 5,000 |
| MR.DATTATRAY MORE | 5,000 |
| MR.ANIL V.NAMUSHTE | 5,000 |
| MR.VIJAY GOVIND NATU | 5,000 |
| SMT.PUSHPA K.NAYAK | 5,000 |
| MR.MUKUND NERLEKAR | 5,000 |
| MR.S.B.NIMISHE | 5,000 |
| MR.ANANT L.NIRANTAR | 5,000 |
| SMT.VRUSHALI A. OKE | 5,000 |
| MR.V.V.PANHALKAR | 5,000 |
| MR.SURESH PARANJAPE | 5,000 |
| MR.MOHAN PESHAVE | 5,000 |
| MR.P.M.PONKSHE | 5,000 |
| MR.H.B.POOJARI | 5,000 |
| MR.N.POPAT | 5,000 |
| MR.P.S.RAJE | 5,000 |
| MR.BALKRISHNA RANDIVE | 5,000 |
| SMT.MAHATI HARISH RAUT | 5,000 |
| MR.ARVIND M.RAYKAR | 5,000 |
| MR.VILAS D.SAKRI | 5,000 |
| SMT.SUSHAMA SAMANT | 5,000 |
| MR.N.K.SAMPATH | 5,000 |
| MR.SUDHIR K.SHEVDE | 5,000 |
| MR.JAYANT A.SOHONI | 5,000 |
| SMT.UTTARA SOMAN | 5,000 |
| MR.SHRAWAN SONAR | 5,000 |
| SMT.IVONE M.SOUZA | 5,000 |
| MR.Y.R.TASE | 5,000 |
| MR.BASANTKUMAR TIWARI | 5,000 |
| MR.KAMALAKAR UMALKAR | 5,000 |
| MR.SURESH UMALKAR | 5,000 |
| MR.G.G.VHANALKAR | 5,000 |
| MR.DATTATRAY VIDWANS | 5,000 |
| SMT.SUHAS N.VIJAYKAR | 5,000 |
| A WELLWISHER | 5,000 |
| A WELLWISHER | 5,000 |

**OUR COURT CASE NO. 1875 OF 2013**

As informed by our advocate as well as Mr. Pathak G. S., SBIPA, Delhi Circle, our Federation case was taken up on 9-11-2017 at 3 p. m. by Justice Khanna and Naveen Chavla. Our counsel was directed to file the amended W.P. in ten days and three weeks' time granted for reply. Case stands posted before deputy registrar on 13rd December 2017 for confirmation of completion of pleadings. **The matter to come up before the court on 9th January 2018 for hearing.** We are also required to mention before Hon'ble Chief justice for retaining the matter before the same bench.

**Ramesh Babu**
General Secretary, SBIPAHC/FSBIPA

ललित

# संवाद मनामनातील

टी. व्ही. वर एक कार्यक्रम चालू होता. तेव्हा त्यात एक आई मुलाला उठवण्याचा निष्फळ प्रयत्न करुन थकते अन् शेवटी स्वतःच्या मोबाईलवरुन मुलाचा नंबर फिरवते. अन् काय चमत्कार- त्या चिरपरिचित संगीताने, कशालाही दाद न देणारा मुलगा विजेच्या चपळाईने फोन उचलतो. आई फोनवरुनच त्याला सुनावते.

हा प्रसंग पाहून चेहऱ्यावर हसू नक्कीच उमटलं पण त्याचबरोबर मी थोडी विचारात पडले. घरातल्याच माणसाशी बोलण्यात फोनची मध्यस्थी लागावी ही बाब विशेष हितकर नाही. पण आजूबाजूला पाहिलं तर हेच दिसतं की रस्त्यावरुन चालणारे, गाडी चालवणारे, दुकानात खरेदी करणारे किंवा बस स्टॉपवर शेजारी बसून बसची वाट पाहणारे सारेच कानाशी लावलेल्या यंत्राचे गुलाम आहेत.

पूर्वीच्या काळी 'गोष्ट' ही सर्वांचीच आवडती गोष्ट होती. मग ती राजाराणीची असो, भूताखेताची किंवा जादूटोण्याची, त्यातली गंमत, थरार साऱ्यांनाच हवाहवासा वाटे. प्रत्येक घरी एक गोष्टीवेल्हाळ माणूस असेच. कधी आजी, आजोबा नाहीतर एखादा काका, दादा, अगदी येणारा पाहुणा सुद्धा! या गोष्टीमधे सर्व लहान-थोरांना बांधण्याची शक्ती होती. रात्री जेवण झाल्यावर एकमेकांबरोबर दिवसभरातील घडामोडींची चर्चा रंगत असे. काही खुपणाऱ्या गोष्टी तर काही भावलेल्या गोष्टी सर्वांमध्ये सांगितल्यावर मनावर आलेला ताण किंवा झालेला आनंद हा वाटला जायचा.

आता मात्र दूरदर्शन, संगणक किंवा दूरभाष, भ्रमणध्वनी यासारखे अनेक दैत्य या संवादांचा विध्वंस करायला हजरच आहेत. या दैत्यांना काबूत ठेवायचं का त्यांच्या ताब्यात आपलं मन, बुद्धी द्यायची हा प्रश्न ज्याचा त्याने सोडवायला हवा. पण या धावपळीच्या युगात एवढा विचार करायला वेळ कुणाला आहे?

संध्याकाळी कधी येणार? आज केलेली भाजी आवडली का? यासारख्या उत्तरे देण्याऐवजी 'मी तुला एस. एम. एस. करते' या एका वाक्याने सारे काही हातावेगळे (सॉरी! मोबाईलवेगळे) केले जाते.

आमच्या लहानपणी अभ्यासाला पहाटे उठवण्यासाठी आई किंवा वडिलांना तीनतीनदा बजावून सांगत असू कारण इतकी खात्री असे पण आता मोबाईलमध्ये लावलेल्या गजराने आईची जागा घेतली आहे. दूरदर्शनवरील दैनंदिन मालिकांमुळे घरीदेखील त्या वेळेकडे डोळे व ध्यान लागलेले असते. आपल्या माणसांची सुखदुःखे यापेक्षा मालिकांमधील व्यक्ती व त्यांचे द्वेष-मत्सर, हेवेदावे आपले वाटू लागले आहेत. एका मालिकेचा एक भाग जरी चुकला तरी अस्वस्थ होणारी माणसं, प्रेमाने दिवसभरात कुटुंबातील कुणाशीच बोललो नाही तर खंतावत नाहीत ही फारच व्यथित करणारी गोष्ट आहे.

मोठ्या माणसांची ही कथा तर मुलं तर लहानच. त्यांना कार्टूनची रंगीबेरंगी दुनिया खिळवून ठेवेल यात नवल ते काय? स्वतः गोष्टींच्या पुस्तकात हरवून जाण्याचा आगळा आनंद मुलं विसरूनच गेली आहेत.

दिवाळी-गणपती या सणांच्या निमित्ताने पोटापाण्यासाठी विखुरलेली माणसं एकत्र येणं हे तरी अजून काही ठिकाणी पाहायला मिळतं. पण दैनंदिन जीवनात मात्र या वाढत्या सुखसोईनी जिव्हाळा, आपुलकी या भावनांना उतरती कळा आली आहे. घर माझं आहे, त्यातील माणसं माझी आहेत अशी भावनाच नाहीशी होऊ लागली तर एकमेकांसाठी केला जाणारा त्याग किंवा तडजोड यातील आनंद कुठून कळणार? मुलेही बहुतेक एकुलती एक असल्याने शेअरिंग वाटून घेण्यातली गोडी त्यांना माहीतच नसते. काही गोष्टी फक्त भावंडातच असतात त्यांची खुमारी कधीच कमी होत नाही पण आता मात्र असं चित्र दिसतं की प्रत्येक जण 'माझं आणि माझं' या भावनेनंच पछाडलेला आहे. एकमेकांशी बोलून समस्या सुटतात, घरातली मोठी माणसं, भावंडं यांच्याशी संवादातून अनेक कटू गोष्टी

टाळता येतात. अवघड वाटणारे गुंतागुंतीचे प्रश्न चुटकीसरशी सुटतात. त्यासाठी बाहेरच्या कौन्सिलरची गरज नाही.

या वेगवान युगात प्रत्येकाची इतरांशी व स्वतःशीदेखील स्पर्धा आहे. मग लहानग्यांची मने कोमेजतात, उमलत्या कळ्यांना हळूच फुलवणारे हळूवार नाते नाही उरत. फक्त धावणं आणि धावणं एवढंच! मोठ्या माणसांच्या प्रेमाने दिलेल्या थापेइतकेच त्यांनी अनुभव व अधिकाराने भल्यासाठी सुनावलेल्या चार गोष्टी यातदेखील वेगळाच गोडवा असतो पण आता या काळात कुणालाच या कशाची ना गरज ना किंमत!

संध्याकाळी अंधाराची शाल हळूवार ओढणाऱ्या दिवसाला देवासमोर तेवणारी दिव्याची मंद ज्योत निरोप देते. तिथे बसून डोळे मिटून हात जोडून प्रार्थना, स्तोत्र म्हणणारे आजीआजोबा किंवा आईबाबा अन् मुले हे दृश्य आता फक्त पूर्वीच्या पुस्तकातच दिसेल. आता टी.व्ही. वर सादर होणाऱ्या चर्चा व संवाद इथेच फक्त संवाद उरला आहे असं मला वाटतं.

म्हणूनच आपण सर्वांनी विचार करून या नव्या युगातील मोबाईल, टी.व्ही., संगणक इ. गोष्टींच्या किती आधीन व्हायचे आणि जीवनाचा तोल बिघडवायचा हे ठरवायला हवे!

सौ. विजया ओगले, पुणे
मो. ९०४९०४६३५०

४०
१७

### अभिनंदनीय !

डोंबिवली (पूर्व) येथील सभासद सौ. श्रुती श्रीकांत कर्डेकर यांनी श्रीमत् भगवद्गीतेचे १८ अध्याय मुखोद्गत करुन शारदापिठम्-शृंगेरी (कर्नाटक) येथे जुलै २०१७ मध्ये परीक्षा दिली. या परीक्षेत त्यांना उच्च श्रेणीचे रु. २१०००/- चे बक्षीस श्री. शंकराचार्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

असोसिएशनतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

सेक्रेटरी

## प्राजक्त



प्राजक्ताची फुलं रोजच रस्त्याच्या कडेला जमिनीवर पडलेली दिसतात. वाटतं कुणी तोडण्याची वाट न पाहताच ही खाली पडतात. कारण पारिजातकाची फुलं तोडायची नाहीत वेचायची असतात. स्वतः अलगद खाली पडतात. फुलं खाली पडतांना आवाज होत नाही. इतकी हळूवार नतमस्तक. दुसऱ्याला सुगंधानंद देण्यासाठी ती झाडावरुन ओघळून पडतात. नाजूक ५ पांढऱ्या पाकळ्या आणि केशरी देठाचं हे फूल पाहून असं वाटतं की खाली पडल्यावर ह्या फुलाला किती त्रास झाला असेल, इजा झाली असेल. डोळ्यातून जसे आनंदाश्रु, दुःखाश्रु ओघळतात तशीच ही पारिजातकाची फुलं अलगदपणे ओघळून वाऱ्याबरोबर गरगरत खाली पडतात. काही भगवंताच्या गळ्यात हार होऊन तर काही त्याच्या चरणांवर विराजमान होतात आणि काही बिचारी तशीच सुकून जातात.

सुख सांगावं जनात दुःख मात्र ठेवावं मनात. कसं वागा हे माझ्याकडून शिका असा संदेश, शिकवण प्राजक्त आपल्याला देत आहे असं वाटतं. झाडापासून विलग होताना शांतता पाळतात. छोट्याशा आयुष्यात सर्वांना सुगंधानंद देतात. आपल्या अंगणात दारातच नाही तर बाजूच्या अंगणात पडून त्यांना पण सांगतात, सर्वांना आनंदीत करायचं, सुगंध द्यायचं काम मी करतो. तुम्ही पण एकटे आनंदीत होऊ नका. सगळ्यांनाच आनंदात ठेवा.

माणसाचं आयुष्यही असंच असतं. कुणी अल्पायुषी तर कुणी दीर्घायुषी असतात. प्राजक्ताच्या फुलासारखी थोड्या अवधीत मोठी कामगिरी करुन आनंद देऊन जातात. आयुष्य कधी संपून जाईल हे माहीत नाही. प्राजक्तासारखा सुगंध द्यावा.

सुकर्म, सुविचार, सद्वर्तन ठेवून दुसऱ्याला आनंद द्यावा. त्यांना झालेला आनंद पाहून स्वतःही आनंदीत व्हावं.

सौ. निशा चिपळूणकर, पुणे
मो. ९८८१७७३७४१

२९
१७

ललित

# कटाक्ष

ईश्वराने सर्व मानवजाती व प्राणीमात्रांस आवश्यक तेवढी ज्ञानेंद्रिय दिली आहेत. पण त्यांची कार्यक्षमता मात्र एकसारखी नसते. कोणाची नजर तीक्ष्ण असते तर कोणाचे कान तिखट आहेत असे म्हणतात. मानवाला देखील डोळे, कान, नाक, जीभ, स्पर्श ही पाच ज्ञानेंद्रिय आहेत. आता त्यात भलेही कुणाच्या डोळ्याला आपल्या पायाखाली काय जळतंय हे दिसत नसले तरी समोरच्या व्यक्तीचे भविष्य बघण्याची दूरदृष्टी मात्र असते. त्याचप्रमाणे कोणाला स्वतःच्या हाताला लावलेल्या अत्तराचा सुवास येत नसला तरी इतरांच्या कटकारस्थानाचा वास मात्र ताबडतोब येतो. कोणाच्या जीभेची चव गेलेली असली तरी त्याची जीभ मात्र चवचाल असू शकते. तसेच कोणाला एखादी गोष्ट शंभरवेळा सांगूनही ऐकू येत नाही पण काही वेळा नको ते नेमके ऐकायला येते.

या सर्व पाचही ज्ञानेंद्रियात डोळा सर्वात पहिल्या स्थानावर आहे. या गोष्टीकडे आपल्याला अजिबात दुर्लक्ष करता येणार नाही. यामुळे हे नक्की की डोळ्याचे मोठेपण इतर ज्ञानेंद्रियांच्या डोळ्यात येत असणार. ईश्वराने डोळे सर्वांना दिले असले तरी काही लोक डोळे असून आंधळे असतात तर काहींना हे दृष्टीचे वरदान न मिळाल्याने त्यांच्यासाठी सारी सृष्टी दृष्टीआड झाली असते. आता डोळ्यांना हे पहिले स्थान मिळायला कारणंही तशीच डोळ्यात भरण्यासारखी आहेत. अगदी उदाहरण द्यायचे झाले तर हा संवाद पाहा ''अहो मी ऐकलंय की, त्या देशपांडेच्या मुलीचं कुलकर्णीच्या मुलाशी लफडे आहे म्हणे. पण ती मुलगी किती सालस आहे.'' या संवादात ऐकणे आणि डोळ्यांनी पाहणे यात फक्त चार बोटांचेच अंतर आहे. असे असले तरी डोळे हे कानापेक्षा चार बोटे श्रेष्ठच. मी माझ्या डोळ्यांनी पाहिले असे म्हणून लोकं आपल्या म्हणण्याची सत्यता पटवीत असतात. न्यायालयात सुध्दा 'आय विटनेस' महत्वाचा साक्षीदार असतो व आयविटनेस हाच पुरावा म्हणून ग्राह्य धरला जातो. आता डोळ्यांना जे दिसतं ते नेहमीच सत्य असतं असं नाही. कारण तसं असतं तर 'दिसतं तसं नसतं' वगैरे म्हणी अस्तित्त्वात नसत्या आणि दृष्टीभ्रमही झाला नसता.

डोळे कागदावरची अक्षरे वाचतात. पण 'डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे' असं म्हटल्यावर डोळ्यांच्या पडद्यावर सुध्दा लिहीता येतं का? असं विनाकारण वाटतं. अनेक मोठे लेखक व कवींनी केलेल्या डोळ्यांच्या वर्णनामुळे कधी कधी डोळ्याला डोळा देणे याची सुध्दा भीती वाटणे स्वाभाविकच आहे. आता बघा 'डोळे हे जुल्मी गडे' 'डोळे तुझे शराबी' वगैरे असताना तुमच्यासारख्या पापभिरु माणसानं दारुच्या दुकानाकडे डोळे वर करुन पाहण्यापेक्षा कानाडोळाच केलेला बरा. डोळे पाहण्याचं काम करतात पण या पाहण्यात सुध्दा अनेक प्रकार आहेत. जसे कोणी नाकासमोर पाहतो तर कोणी तिरकस नजरेने चोरुन पाहतो. कोणाची नजर बेरकी तर कोणाची मारक्या म्हशीसारखी. कोणाचे डोळे लब्बाड तर कोणाची काकदृष्टी तर कोणाचे डोळे जादुगर. कोणाच्या डोळ्यात विखार तर कोणाच्या डोळ्यात विकार, कुणाची नजर चक्क पापी. कोणाचे डोळे असतात काळेभोर तर कोणाचे तपकीरी खाकाडी, कोणाचे डोळे घारे आणि कोणाचे हिरवेगार! डोळ्यांच्या आकारावरुन सुध्दा कोणी मृगनयनी तर कोणी मिनाक्षी. कोणाचे डोळे मांजरीसारखे तर कोणाचे निर्विकार, कोणाचे बेडकासारखे बटबटीत तर कोणाचे गोल गरगरीत.

कुणाचे डोळे काय पाहतील हे ठरवणं कठीणच काम. कारण स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही पण दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ मात्र दिसतं. आता खरं पाहिलं तर आपले डोळे आपल्याला दिसत नाहीत मग मुसळ कसं दिसणार?

बहुतेक जणांच्या डोळ्यांना दुसऱ्याच्या चुका पटकन् दिसतात. उदाहरण द्यायचे झाले तर अगदी घरातले आदरणीय व्यक्तीमत्व म्हणजे सासू परीक्षक, टीकाकार असते. आई आपल्या बाळाची द्रुष्ट काढते कारण बाळाला म्हणे दृष्ट लागते म्हणजेच काही जणांचे डोळे असा दृष्टपणा करतात तर! आता ही अंधश्रध्दा म्हणावे तर मग अंधश्रध्दा असणारे डोळस कसे काय असू शकतात? काहींच्या डोळ्यांची भाषा वेगळी तर बोलण्याची वेगळी. काही गोष्टी न बोलता डोळेच बोलतात असे म्हणतात.

थोडक्यात काय तर डोळा जसा चांगल्या गोष्टी पाहतो तसाच तो वाईट गोष्टीही पाहतो. तो पुण्य पाहतो तसेच पापही पाहतो. काही पापांमध्ये तो साक्षीदार असतो तर काही ठिकाणी तो प्रत्यक्ष भागीदारही असतो. म्हणून जे मंगल आहे ते कानांनी ऐकावे व जे शुभ आणि पवित्र आहे तेच डोळ्यांनी बघावे. पण असे असले तरी कोणाच्या डोळ्यांनी काय पाहावे हे ज्याचं त्यानीच ठरवलं पाहिजे!

श्रीपाद टेंबे, पुणे, मो. ९१५८०८८०४२

३६
---
१७

## जाहीर कृतज्ञता व आभार

या वर्षीचा कै. गंधे पुरस्कार मला 'स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन'च्या वतीने देण्यात आला. त्यासाठी मी सर्व संबंधितांचे मनापासून आभार मानतो व त्यांना धन्यवाद देतो. याला मुख्य कारण मी ठाणे जिल्ह्यातील सभासद संख्या वाढविली आणि सुमारे चार लाख रूपयांचे योगदान दिले, हे असावे. गेली २० वर्षे मी हे काम कुठलीही अपेक्षा न ठेवता निरलसपणे करीत आहे आणि यापुढेही करत राहीन याविषयी सभासदांनी खात्री बाळगावी. या पुरस्काराने मला प्राप्त झालेला आनंद व समाधान अवर्णनीय आहे. चांगले काम केल्यानंतर मिळणारा हा आनंद इतरांनाही स्फुरण देणारा ठरो आणि जास्तीत जास्त कार्यकर्ते अहमहमिकेने कार्यास लागोत ही परमेश्वरापाशी माझी प्रार्थना. आपल्या असोसिएशनची निवृत्तीवेतनात वाढ, औषधोपचारावरील वाढता खर्च, सहलीला किंवा हवापालट करण्यास गेलेल्यांना हॉलिडे होम उपलब्ध करून देणे, महागाई भत्त्यातील अर्धवार्षिक वाढ आदी संबंधीची कामे चालू आहेत. त्यासाठी न्यायालयीन पातळीवरही आपल्या संघटनेचे प्रयत्न चालू आहेत. आदरणीय कै. श्री. पाबळकर यांनी स्थापन केलेल्या या संस्थेमध्ये कै. गद्रे साहेब तसेच सर्वश्री बी. जी. दांडेकर, एस.बी. गोखले आदींनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले आहे. त्यांचाही मी ऋणी आहे. आपल्या डोंबिवली पूर्व शाखेत गेली २०-२२ वर्षे मी पेन्शनरांचा मेळावा आयोजित करीत आहे आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या निमित्ताने डोंबिवली शाखेतील शाखाव्यवस्थापक, सर्व अधिकारी वर्ग आणि संबंधित कर्मचारी यांचेही मी आभार मानतो. मला मिळालेल्या पुरस्कारासाठी सर्व संबंधितांचे पुन्हा एकदा जाहीर आभार व कृतज्ञता व्यक्त करतो.

धन्यवाद!

सुभाष वासुदेव आगरकर, ९९२०५९७२३१


ONLY FOR SENIOR CITIZENS
JUST FOR RELAXATION
***COMFORTABALE HOME STAY @ ALIBAG***
# Aashiyana Resort
**3 NIGHTS 4 DAYS**
EVERY MONDAY CHECK IN & THURSDAY CHECK OUT
FOR 3 DAYS PACKAGE COST
**RS 2500/-** PER PERSON
NON AC ROOM STAY & VEG FOOD
NON VEG FOOD & AC ROOM COST EXTRA
*DAILY: BREAKFAST+LUNCH& DINNER WITH TEA COFFEE*
Contact: Rajesh Ranade
**750 7474 825**
*Post Akashi-Alibag-Murud Rd-Near Amit Beer Shoppy*


## मोह

भुलवले मन किती  
टिमटिमणाऱ्या ताऱ्यांनी-  
झुलवले तन कसे  
टपटपणाऱ्या प्राजक्तफुलांनी--  
हरवले क्षण किती  
हुरहुरणाऱ्या त्या आठवणींनी--  
फिरवले मन कसे  
झरझर हिरव्या निसर्गातुनी--  
ठरवले किती जरी  
दूर राहायचे आज दुर्लक्षुनी--

५० / १७

-विजयकुमार देशपांडे, सोलापूर  
मो. ९०११६६७१२७

SBI

# Avail benefits of the digital life.

## Simply link your Aadhaar Number and Mobile Number with your bank account.




**Below are the channels through which you can link your Aadhaar and mobile number to your bank account**

| Aadhaar Number | Mobile Number |
|---|---|
| SMS to 567676: UID <space> Aadhaar Number <space> A/C Number | Internet Banking |
| Internet Banking or State Bank Anywhere (Mobile App) | ATMs and Branches |
| ATMs and Branches | |

- Hassle-free receipt of Government benefits • More secured transactions • Missed call banking
- Alerts on transactions • Updated information on bank's products and services

Amended PML rules requires existing customers to submit their Aadhaar number by 31st December, 2017.

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2017-2019**
**Licence to Post without Prepayment No.WPP - 22/2017-19 at Market Yard P.S.O.**
**Published on 25-11-2017 and Posted on 25-11-2017**

## बळीराजा

खोताची वाडी। मामाची माडी।
शिरप्या जुंपे। बैलाची गाडी
बियाणं पेरलं। पाणी चारलं।
रखमाच्या गळ्यात। सोन्याचं डोरलं ॥

पिकलं सोनं। हिरवी पानं।
मंजीच्या डोळ्यात। भरलं सपान
हिरीवर मोटं। ज्वारीची ताटं।
गणाप्या करतो। बाजारहाटं ॥

तांबडी माती। कणसात मोती।
राम्याच्या हाती। सुपं नी पोती
पाटाचं पाणी। उभी बुजगावणी।
नाम्या फिरवी। दोरीची गोफणी ॥



ढवळ्या पवळ्या। नारळ झावळ्या।
बारक्या तोडी। काकड्या मावळ्या
शेणाची गवरी। आंब्याची चवरी।
हौसा थापते। बाजरी भाकरी ॥

आंबा जांभुळ। बांधावर बाभुळ।
दत्त्या राखी । चिंचा गाभुळ
डुलती शिवारं। नदी डोंगरं।
हणम्या निरखी। उडती पाखरं ॥

कुडाचं झोपडं। उबेची कापडं।
तान्ह्यानं ल्यालं। अंगडं टोपडं
काळी आई। पोटाला देई।
बळीराजाच्या । मनी विठाई ॥

५१/१७

अरुणा नगरकर, पुणे, मो. ९६५७१४००९५

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 022-25446837
Timings : On Tuesday & Friday from 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030.Ph:020-24332141**

To,

**Publisher** – Shri. Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri Shailendra Borkar, Director : Sanwad Tradeprints Pvt. Ltd. B/7 Gowaikar Building, 595, Shaniwar Peth, Pune 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.